सन २०२४-२५ करीता अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत कार्यक्रम अंतर्गत रु.२.७९६ कोटी इतका निधी महाऊर्जा कार्यालयास रोखीने वितरीत करणेबाबत. (मागणी क्र.के-६ लेखाशीर्ष क्र.२८१०००३४)

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०२४/प्र.क्र.११४/ऊर्जा-७.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २० मार्च, २०२५.

वाचा :-

१. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२००७/प्र.क्र.५९०/ऊर्जा-७, दि.११.०९.२००७
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७, दि.१३.०१.२०११.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०२४.
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक २५.०७.२०२४.
५. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, क्र.बीयुडी-२०२४/प्र.क्र.११४/ऊर्जा-७, दिनांक १०.१२.२०२४ व दिनांक १७.०३.२०२५.
६. महाऊर्जा कार्यालयाचे पत्र क्र.लेखा/बीपी-००६/एन.आर.एस.ई प्लान २०२४-२५/२४-२५/७५५ आणि १६१, दिनांक २३.०७.२०२४ व दिनांक १७.०२.२०२५.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक १७.०३.२०२५.

प्रस्तावना:

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता "मागणी क्रमांक के-६, २८१० नवीन व नवीकरणीय ऊर्जा, (००)(०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (२८१०००३४)" या लेखाशीर्षाखाली रुपये ३९.९४६३ कोटी इतकी सुधारित तरतूद मंजूर करण्यात आली आहे. सदर मंजूर तरतूदीमधून संदर्भाधिन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये रु.५.०१ कोटी इतका निधी अपारपंरिक ऊर्जा विषयक विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जा कार्यालयास उपलब्ध करून देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. आता, महाऊर्जा कार्यालयाच्या संदर्भाधिन क्र.६ येथील प्रस्तावाच्या अनुषंगाने पवन संनियंत्रण कार्यक्रम/वारा मापन कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन फी-रु.०.५२१ कोटी, ऊर्जा बचत कार्यक्रम-रु.०.२२५० कोटी, राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पारितोषिक योजना-रु.०.३५० कोटी, ऊर्जा संवर्धन जनजागृती योजना-रु.०.४०० कोटी आणि अपारंपरिक ऊर्जा कार्यक्रमाचा प्रचार, प्रसिध्दी व प्रदर्शन-रु.१.३० कोटी असे एकूण रु.२.७९६ कोटी इतका निधी महाऊर्जा कार्यालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता मागणी क्र.के-६, लेखाशीर्ष क्र.२८१०००३४ खाली मंजूर सुधारित अर्थसंकल्पिय तरतूदीमधून पवन संनियंत्रण कार्यक्रम/वारा मापन कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन फी-रु.०.५२१ कोटी, ऊर्जा बचत कार्यक्रम-रु.०.२२५० कोटी, राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पारितोषिक योजना-रु.०.३५० कोटी, ऊर्जा संवर्धन जनजागृती योजना-रु.०.४०० कोटी आणि अपारंपरिक ऊर्जा कार्यक्रमाचा प्रचार, प्रसिध्दी व प्रदर्शन-रु.१.३० कोटी असे एकूण रु.२.७९६ कोटी (रुपये दोन कोटी

एकोणऐंशी लक्ष साठ हजार फक्त) इतका निधी महाऊर्जा कार्यालयास वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक के-६, २८१० नवीन व नवीकरणीय ऊर्जा, (००)(०१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (२८१०००३४)" या लेखाशीर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री.नारायण श्री.कराड, सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्रीम.अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा.

५. सदर योजनेसाठीच्या खर्चाची उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महाऊर्जा कार्यालयाने शासनास सादर करावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी केवळ या शासन निर्णयातील नमूद योजनांसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल, याची खातरजमा करण्यात यावी. विहित कालावधीत सदर निधी कोणत्याही परिस्थितीत अखर्चित राहिल्यास त्याची संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. मान्य व अनुज्ञेय काळात खर्च करण्याची जबाबदारी महासंचालक, महाऊर्जा यांची राहील. याबाबतचा त्रैमासिक अहवाल न चुकता सादर करण्याची जबाबदारी लेखाविषयक बाबी हाताळणाऱ्या सहायक/उप संचालक (लेखा) म्हणून कार्यभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यांवर टाकण्यात यावी.

६. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर, पशुसंवर्धन आयुक्तालयाशेजारी, औंध, पुणे यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, मुंबई, महाराष्ट्र-१ यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

७. मागणी क्र.के-६, लेखाशीर्ष क्र.२८१०००३४ मधून निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, सदर देयक सशर्त असून या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक तसेच, उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

८. अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत कार्यक्रम अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना निधी वितरीत करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०२४ मधील आवश्यक त्या सूचना व अटींचे पालन करून तसेच, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक २५.०७.२०२४ व दिनांक १७.०३.२०२५ मधील तरतूदींनुसार व वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.७८/२०२५/व्यय-१६, दिनांक १८.०३.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२०१८१७३७९७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADIP DATTATRAY BHINTADE

Digitally signed by PRADIP DATTATRAY BHINTADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=148166d6ba6b6b7506a6c02726418297ae7252d6770d6eeda6fcf82676c59eb5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=70AB5B7C0DEE32FCEE54C2D940368CB9D34A7AEDC3404176B7D9B0082921CFF0, cn=PRADIP DATTATRAY BHINTADE
Date: 2025.03.20 18:18:52 +05'30'

(प्रदिप भिंताडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
३. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मंत्री (अपारंपरिक ऊर्जा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री (ऊर्जा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१५.निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१६. सचिव, मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या.,मुंबई,
१८. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१९. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२०. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
१८.महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
१९. सह सचिव (ऊर्जा-७/३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. निवड नस्ती/ऊर्जा-७.